# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्यालय, २रा मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
दुरध्वनी क्र.०२२-२८१९२८२८ ई-मेल आयडी commissioner@mbmc.gov.in


दि. ११ /०७ /२०२५

जा.क्र. मनपा/आस्था/ ११८८ /२०२५-२६

**प्रत्यायोजन आदेश**

**विषय: अतिरिक्त आयुक्त पदाच्या पदभाराबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील "अतिरिक्त आयुक्त" यांचेकडे सोपविलेल्या विविध विभागांचे पदभाराबाबत यापूर्वी पारित केलेले सर्व आदेश याद्वारे अधिक्रमित करून सदरचे नव्याने आदेश पारित करणेत येत आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४९ अन्वये खालील दर्शविलेल्या खात्यांचे/विभागांचे प्रशासन आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या निरनिराळ्या प्रकरणांत विविध तरतुदीखाली नमूद केलेले आयुक्तांचे अधिकार आणि कर्तव्य, महानगरपालिका आयुक्तांचे सर्वसाधारण नियंत्रणसापेक्ष खालील अतिरिक्त आयुक्त यांच्या नावाखाली दर्शविल्याप्रमाणे या आदेशान्वये सोपविण्यांत येत आहेत.

| अ) | **श्रीम.प्रियंका राजपुत, अतिरिक्त आयुक्त** | | |
|---|---|---|---|
| 1. | अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम निर्मुलन व नियंत्रण | 10. | बाजार लिलाव |
| 2. | मालमत्ता कर | 11. | पे & पार्क, भुईभाडे |
| 3. | स्थानिक संस्था कर | 12. | समाज विकास |
| 4. | वाहन व यांत्रिकी | 13. | क्रीडा आणि सांस्कृतिक कार्य |
| 5. | मध्यवर्ती भांडार | 14. | पशुवैद्यकीय |
| 6. | परवाना | 15. | अभिलेख |
| 7. | जाहिरात | 16. | ग्रंथालय |
| 8. | सार्वजनिक आरोग्य | 17. | सुरक्षा |
| 9. | ई- टेंडरिंग, सी.सी.टी.व्ही. यंत्रणा | 18. | जन्म व मृत्यू |

| ब) | **श्री.संभाजी पानपट्टे, अतिरिक्त आयुक्त** | | |
|---|---|---|---|
| 1. | सामान्य प्रशासन व आस्थापना | 9. | शिक्षण |
| 2. | घनकचरा व्यवस्थापन (दैनंदिन कचरा संकलन) | 10. | संगणक व माहिती तंत्रज्ञान |
| 3. | लेखापरीक्षण | 11. | लेखा |
| 4. | परिवहन | 12. | महिला व बालकल्याण |
| 5. | उद्यान | 13. | निवडणूक व जनगणना |
| 6. | अग्निशमन | 14. | आपती व्यवस्थापन |
| 7. | पर्यावरण | 15. | विधी |
| 8. | मिळकत | | |

उपरोक्त अधिकाऱ्यांनी वरील विभागांचे कामकाज वेळोवेळी त्यांना प्रत्यायोजित केलेल्या आयुक्तांच्या वितीय व प्रशासकीय अधिकारांच्या मर्यादेत राहून पहावयाचे आहे. वितीय बाबींशी निगडीत सर्व प्रस्ताव/प्रकरण मंजूर करण्यापूर्वी मुख्यलेखाधिकारी व मुख्यलेखापरीक्षक यांची सहमती घ्यावी.

स्थायी समिती, महासभा अथवा केंद्र किंवा राज्य शासनाकडे मंजूरीसाठी पाठवावयाचे सर्व प्रस्ताव आयुक्तांचे पूर्व मान्यतेने व मंजूरीनेच पाठविणे बंधनकारक राहील.

वरीलप्रमाणे संबंधित विभागांचे कामकाज पाहत असताना महानगरपालिका आपल्या पदावधीत व त्या पदाच्या आधारे पार पाडलेल्या व केलेल्या सर्व कृती व गोष्टी ह्या सर्व प्रयोजनांसाठी आयुक्तांनी पार पाडल्या आहेत व केल्या आहेत असे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४९ नुसार मानले जाईल.

(राधाबिनोद अ. **शर्मा**, भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,

1. श्रीम.प्रियंका राजपुत, अतिरिक्त आयुक्त
2. श्री.संभाजी पानपट्टे, अतिरिक्त आयुक्त

प्रत माहितीस्तव

1. उप-आयुक्त (सर्व)
2. सर्व विभाग प्रमुख/खातेप्रमुख
3. आदेशनस्ती